# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४०००१

दुरध्वनी : ०७१२-२५२२९९१ फॅक्स : ०७१२-२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/१७/९ दिनांक: २५ एप्रिल २०१७

### २०१७ मध्ये पार पडणाऱ्या विद्यापीठातील प्राधिकरणे व मंडळांच्या निवडणुकांविषयी स्थापित करण्यात आलेल्या निवडणुक कक्षाबाबत

**सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की,**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार मध्ये दिनांक १७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिध्द केलेला, महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषितर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद असलेल्या सन २०१५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ मधील कलम २ नुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २५ ऑगस्ट २०१५ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्राधिकरणे व मंडळाच्या निवडणुका दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या होत्या.

ज्याअर्थी, दिनांक १७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिध्द केलेला वरील सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ रद्द करून महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ मध्ये दिनांक १ ऑक्टोबर २०१६ रोजी महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषितर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद असलेल्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ वर्ष २०१६ प्रसिध्द केलेला होता व सदर अध्यादेशातील कलम २(१)(ए) नुसार विद्यापीठ अधिनियमाच्या अधिसूचीत उल्लेख केलेल्या कोणत्याही विद्यापीठात, त्या विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा कोणतेही मंडळ यांच्या कोणत्याही निवडून आलेल्या सदस्यांचे रिक्त पद, मग ते कोणत्याही कारणाने रिक्त झालेले असो, भरण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत किंवा नविन विद्यापीठ कायदा अस्तित्वात येईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) कोणत्याही निवडणुका घेण्यात येणार नाही, असा निर्णय घेतला होता.

ज्याअर्थी, शासनाच्या वरील निर्णयानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विविध प्राधिकरणे व मंडळांच्या निवडणुका दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत किंवा नविन विद्यापीठ कायदा अस्तित्वात येईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) घेण्यात येणार नसल्याचे विद्यापीठाद्वारे दिनांक २१ ऑक्टोबर २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/१६/१८ अन्वये अधिसूचित करण्यात आले होते.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रकाशित केलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार--ब मध्ये **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) मधील कलम १ च्या पोट कलम (२) अन्वये** प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून **दिनांक १ मार्च २०१७ पासून उक्त अधिनियम अंमलात आणण्याचे शासनाने निश्चित केले** असल्याबाबतचा आदेश श्री. सीताराम कुंटे, शासनाचे अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०१७ रोजी निर्गमित केला आहे.

**त्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) मधील कलम ६२(२) मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ नंतर विद्यापीठातील विविध प्राधिकरणांचे गठन करण्याचे दृष्टिने विद्यापीठातील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर करणे गरजेचे असल्यामुळे व निवडणुकीचे काम सुरळीतपणे पार पाडण्यास्तव विद्यापीठात **निवडणुक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे**. सदर निवडणुक कक्ष विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील इमारत क्रमांक १ मधील **सामान्य प्रशासन शाखेशेजारी असलेल्या कक्षात स्थापित करण्यात आला आहे.** सन २०१७ मध्ये पार पडणाऱ्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीचे **निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव व सहायक निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून उपकुलसचिव (सा.प्र.) आणि उपकुलसचिव (विद्या) हे** राहतील.

**मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये**

**(पुरणचंद्र मेश्राम)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित व संलग्ति महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
३. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख,
४. माहिती शास्त्रज्ञ, यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही ध्यावी.
५. मा. संपादक, सर्व स्थानिक वृत्तपत्रे, यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अधिसूचना आपल्या नामांकित दैनिक वृत्तपत्रामधून "बातमी रूपाने" प्रसिध्द करावी.

**(प्रदीप मसराम)**
**उपकुलसचिव (सा.प्र.)**
**(अति. प्रभार)**